प्रकरण ४ थे

ताराबाई शिंदे आणि पं. रमाबाई यांच्या स्त्री हक्कासंबंधी दृष्टीकोनाचा तौलनिक अभ्यास

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रकरण ४ थे

ताराबाई शिंदे आणि पं. रमाबाई यांच्या स्त्री हक्कासंबंधी दृष्टीकोनाचा तौलनिक अभ्यास

१९ व्या शतकात स्त्री हक्कासंबंधीचे प्रश्न ताराबाई व पं. रमाबाई यांनी अनुक्रमे 'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' पुस्तकात मांडण्याचे साहस केले. ताराबाईंनी 'स्त्री–पुरूष तुलना' हे पुस्तक १८८२ मध्ये प्रसिद्ध केले. त्यानंतर म्हणजे काही दिवसातच पं. रमाबाईंचे 'स्त्रीधर्मनीति' हे पुस्तक १८८२ मध्ये प्रसिद्ध झाले. ताराबाई व रमाबाईंनी ह्या पुस्तकांमध्ये तत्कालिन स्त्रीचे अवनत जीवनाचे चित्रण करून त्यास विरोध दर्शविला आहे. स्त्री सामर्थ्य व स्त्री प्रतिष्ठेचे सूत्र दोघींच्या या लिखाणात समाविष्ट आहे. तथापि, हे प्रश्न मांडण्यात दोघींच्या विचारात अंतर दिसून येते. ताराबाई शिंदे व पं. रमाबाई स्त्री हक्कासंबंधीच मांडणी करीत असल्या तरी त्यांचा दृष्टीकोन भिन्न होता.

पुस्तक लिखाणामागील पार्श्वभूमी

ताराबाई शिंदे व पं. रमाबाई दोघींनीही १९ व्या शतकातील स्त्रियांच्या अवनत स्थितीविरोधी या पुस्तकांच्या माध्यमातून आवाज उठविला. समाजात असलेले पुरूषी वर्चस्व, स्त्रिला असलेले दुय्यम स्थान व हे सर्व टिकविण्यासाठी स्त्रिचा दिला जाणारा बळी याविरोधी वाचा फोडण्यासाठी ताराबाईंनी व रमाबाईंनी समाजाला जागृत करण्याचे कार्य अनुक्रमे 'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' मधून केलेले दिसून येते.

ताराबाई ह्या मराठा समाजात जन्माला आलेली स्त्री असून त्यांनी हे पुस्तक लिहिले. 'तेही धार्मिक वा पौराणिक स्वरूपाचे नव्हे; सामाजिक ज्वलंत प्रश्नासंबंधीचे आहे.' [मालशे (१९७५) ४] त्यांनी 'स्त्री–पुरूष तुलना' पुस्तकात स्त्रिच्या दयनीय अवस्थेविरूद्ध, स्त्री–पुरूष भेदभावाविरूद्ध बंड पुकारले. स्त्रीवर होणाऱ्या प्रत्येक अन्यायास पुरूषच कारणीभूत आहेत अशी भूमिका घेवून स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार

केला आहे. त्यांनी पुरूषांना स्त्रीच्या अवस्थेबद्दल परखडपणे जाब विचारला. 'विजयालक्ष्मी खटल्यात' विजयालक्ष्मीवर भ्रुणहत्येचा आरोप सिद्ध होऊन तिला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यावेळी या विजयालक्ष्मीवर समाजाच्या सर्व स्तरातून टिकेची झोड उठली. या कृत्यासाठी तिलाच जबाबदार धरण्यात आले. व स्त्रियांच्या वर्तणुकीवर तोफ डागण्यात आली. पुरूषसत्ताक समाजातील सर्व दुष्कृत्यांस स्त्रीच जबाबदार असल्याचे ठरवण्यात आले. स्त्रियांवरील पुरूषसत्ताक समाजाने लादलेल्या बंधनांचा पुरस्कारच करण्यात आला. त्यावेळी उद्विग्न होवून ताराबाई शिंदेंनी 'स्त्री–पुरूष तुलना' हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या दुय्यमत्वावर, तिच्यावर होणाऱ्या अत्याचारावर व स्त्री–पुरूष भेदभावावर बोट ठेवले.

याउलट पं. रमाबाईंचे पती बिपीनबिहारी मेधावी मरण पावल्यानंतर त्यांनी कोणत्या पत्नीधर्माने रहावे यासाठी ग्रंथांचा शोध घेतला. पण त्यांना असा एकही ग्रंथ सापडला नाही. त्यावेळी स्त्रियांना काळानुरूप नितिज्ञान देण्याच्या उद्देशाने 'स्त्रीधर्मनीति ' हा ग्रंथ लिहिला.

१९ व्या शतकामध्ये समाजसुधारक स्त्रियांचे प्रश्न अग्रक्रमाने मांडले आणि त्यांच्या सोडवणूकीसाठी काही प्रयत्नही केले. सती बालविवाह, बाला–जरठ विवाह, सक्तीचे वैधव्य, शिक्षणाचा अभाव या प्रश्नांभोवती प्रामुख्याने या समाजसुधारकांचे प्रयत्न होते. त्या काळात स्त्रिशिक्षणाचा फारसा प्रसार झाला नव्हता आणि त्यामुळे स्त्रियांना त्यांच्या दुय्यमत्वाची त्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव, स्त्री–पुरूषांमधील भेद, स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा संकोच या सर्वांची जाणीव असणे अवघडच होते. या पार्श्वभूमीवर ताराबाई शिंदे व पं. रमाबाई यांनी साधारणपणे एकाच वेळेला लिहिलेल्या पुस्तकांमधून नेमक्या याच प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. ताराबाई या बहुजन समाजातील परंतु सत्यशोधक समाजाचा प्रभाव असणाऱ्या कुटुंबातील होत्या. तर रमाबाई संस्कृतच्या गाढ्या अभ्यासक आणि बंडखोर विचारांच्या होत्या. त्यांनी त्या काळात

आंतरजातीय विवाह केला होता. अशा या दोनही बंडखोर स्त्रियांनी एकाच कालखंडात काही दिवसांच्या अंतराने पुस्तके लिहिली आणि स्त्री प्रश्नांची मांडणी स्त्रीवादी दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मांडलेली भूमिका तात्कालिक पुरूषसत्ताक समाजाला रूचणारी नव्हती. परंतु महात्मा जोतिबा फुल्यांनी या दोघींच्याही लिखाणाचे महत्त्व ओळखले. आणि त्यांचे कौतुक केले. जोतिबा म्हणतात,–

ताराबाई पंडिता रमा यांस। जातिदादा वैभव शिकविण्या या
स्वस्त्रियेते जरि ज्ञान दिले होय। रमा तारेशी तरिच शिकवू जाय।
[जोगळेकर (१९९१)२]

जोतिबांनी गौरविलेल्या या दोन स्त्रियांनी स्त्रीप्रश्नांची मांडणी कशा पद्धतीने केली. याचा तौलनिक अभ्यास करून एकूणच या दोन बंडखोर स्त्रिया स्त्रीप्रश्नाकडे कशा बघतात, आणि भारतीय स्त्रीवादाला त्या कोणत्या प्रकारचे वैचारिक योगदान देतात, हे पहाण्यासाठी दोघींच्या विचारांचा एकत्र अभ्यास करणे आवश्यक आहे.

सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक भेद

१९ व्या शतकात समाजसुधारणेत पुरूषांबरोबरीनेच स्त्रियाही पुढे होत्या. पुरूषांबरोबरीने स्त्रियांनीही स्त्रीप्रश्न प्रभावीपणे मांडले असले तरी त्यांच्या ह्या धैर्यामागे त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते. रमाबाई आणि ताराबाई यांनाही त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी पाठिंबा दिल्याचे दिसून येते.

ताराबाईंचे वडील हे सत्यशोधकीय समाजाचे सभासद होते. त्यांचे विचारही बंडखोर व विवेकी होते त्यामुळे त्यांच्या वडिलांनी बापूजी शिंदे यांनी इतर मुलांप्रमाणे ताराबाईंनाही शिक्षण दिले तर पं. रमाबाईंचे वडिलही स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे रमाबाईंना संस्कृत, वैदिक शिक्षण घेण्यास चालना मिळाली आणि त्या विचारप्रवण झाल्या.

ताराबाई व रमाबाईंची शैक्षणिक तुलना केली तर ताराबाईंना इंग्रजी, मराठी, संस्कृत भाषा येत होत्या. त्यांचे वाचन हे विस्तृत होते. त्यांनी संस्कृत ग्रंथही वाचले होते हे लक्षात येते. त्यांनी 'स्त्री–पुरूष तुलना' ग्रंथात त्यावर समीक्षात्मक टिकाही केलेली आहे. त्या काळात म्हणजे १९ व्या शतकात बुलढाणा गावात तुरळक वृत्तपत्रे येत. त्याकाळी स्त्रीने वृत्तपत्र वाचणे म्हणजे अशिष्ठपणाचे कृत्य मानले जात. तरीही ताराबाई वृत्तपत्र वाचन करीत व त्यातील घटनांवर आधारित लेखनही केले. तात्कालिक घटनांची योग्य चिकित्साही त्यांनी केली. ताराबाई ह्या कोर्टकचेरीची कामेही करीत.

तर रमाबाई विद्याध्ययनात पारंगत होत्या. त्यांच्या वडिलांनी व आईने त्यांना संस्कृतचे शिक्षण दिले होते. त्यांना इंग्रजी, संस्कृत, ग्रिक, भाषा येत होत्या. त्या उपदेशपर व्याख्याने देत. त्या प्रवासात येणाऱ्या अनुभवावरून शिकत गेल्या. त्या इंग्लंडला वैद्यकिय शिक्षण घेण्यासाठी गेल्या होत्या. परंतु नीट ऐकू येत नसल्याने ही इच्छा अपूर्ण राहिली. तिथे त्या ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीने प्रभावित होवून त्यांनी धर्मांतर केले. यावरून ताराबाई व रमाबाई ह्यांनी त्यांच्या काळाच्या विरोधी जाऊन शिक्षण घेतले होते. त्यातूनच त्यांची बंडखोर वृत्ती घडत गेली हे दिसून येते.

रमाबाईंवर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्या स्त्रियांनी धर्मपालन करावे, पातिला मदत करण्याइतपत ज्ञान मिळावे असा त्या स्त्रियांना उपदेश देतात. त्या स्त्रियांना स्त्री हक्कांची जाणीव करून देण्यापेक्षाही स्त्री कर्तव्यांची जाणीव करून देतात. यावरून ताराबाई व रमाबाई यांच्या विचारातील भेद दिसून येतो.

ताराबाई ह्या समाजातील स्त्रीवरील बंधनामुळे स्त्रिचा विकास खुंटल्याचे मत व्यक्त करतात. स्त्रिला परक्या घरी जावं लागतं ही सामाजिक पद्धती कोणी निर्माण केली असेल? याचा त्या शोध घेवू लागल्या. त्यावेळी पुरूषसत्ताक पद्धतीनं स्त्रियांवर लादलेल्या गुलामीची जाणीव त्यांना झाली.

ताराबाईच्या 'स्त्री–पुरूष तुलना' व रमाबाईंचे 'स्त्रीधर्मनीति' या दोन पुस्तकांवरून दोघींचाही वाचनप्रपंच मोठा असल्याचे दिसून येते. समाजात घडणाऱ्या घटनांकडे त्या स्त्रिवादी दृष्टीकोनातून पाहताना दिसून येतात. स्त्रिला पुरूषांच्याबरोबरीचे स्थान प्राप्त होण्यासाठी त्या स्त्री–पुरूषांना उपदेश देतात. परंतु हे करताना ताराबाई शिंदे व पं. रमाबाई यांच्या विचारात भिन्नता आढळते. ताराबाई स्त्री हक्क संकोचित होण्यास पुरूषांना जबाबदार धरतात, व पुरूषांना आत्मपरिक्षण करण्यास सांगतात. तर पं. रमाबाई ह्या स्त्रियांना स्वत:हून आत्मपरिक्षण करण्याचा उपदेश देतात. यावरून दोघीही स्त्रीवादी विचार करताना भिन्न दृष्टीकोनातून पाहताना दिसतात यावरून त्यांच्या विचारातील तफावत दिसून येते.

कुटुंबव्यवस्थेत पुरूषाला सर्वश्रेष्ठत्व, दैवत्व बहाल करणाऱ्या, परंपरांना आव्हान देण्यासाठी ताराबाईंनी स्त्री पुरूष समानतेची जागृती करणारे 'स्त्री–पुरूष तुलना' हे पुस्तक लिहिले. समाजातील अन्याय्य विचारसरणीशी दोन हात करण्याचे वैचारिक साहस त्यांनी दाखविले. 'पुरूषप्रधान संस्कृती, पुरूषवर्चस्व ही केवळ दमणकारी यंत्रणाच नव्हे, तर स्त्रीविषयक तुच्छताबुद्धी, अवहेलना प्रसवणारी शक्ती आहे.' [खोले (१९९९) ३२] असे ताराबाई सुचवितात. परंतु रमाबाईंचे विचार थोडेसे मवाळ असल्याचे दिसून येते. स्त्रीचे दुय्यमत्व हे पुरूषांनी वेदाच्या अर्थाचा विपर्यास करणाऱ्या शास्त्रकर्ते व स्त्रियांच्या वर्तणुकीमुळे प्राप्त झाले आहे व स्त्रियांनी पत्नीधर्म पाळलाच पाहिजे असा काहीसा ब्राह्मणी धार्मिक मूलव्यवस्थेचा पुरस्कार करणारे विचार या स्त्रीधर्मनीतितून प्रकट होतात.

दोघींनाही स्वानुभवातून स्त्री प्रश्नांची जाणीव झाल्याचे दिसून येते. ताराबाई ह्या पूर्वापार चालत आलेल्या धर्मवादी परंपरा, बंधनात्मक स्त्री जीवनाच्या शृखंलांची जाणीव होवून त्या झुगारतात. तर पं. रमाबाईंना प्रवासात येणारे अनुभव, स्त्रीवर लादलेले अन्याय्य जीवन धर्मशास्त्रांनी सांगितलेल्या स्त्रीजीवनापेक्षा खूप भिन्न असलेले दिसून आले. त्यामुळे रमाबाई ह्या समाजाने स्त्रिला घातलेल्या बंधनातून मुक्त होण्यासाठी

स्त्रीनेच परंपरेनुसार वर्तन करण्यास सांगतात. दोघींच्या ह्या भूमिका टोकाच्या दिसतात. ताराबाई प्रस्थापित पुरूषसत्ताक मूल्यांच्या विरोधात आव्हान देवून स्त्री–पुरूष नैसर्गिक समतेचा पुरस्कार करतात व स्त्री हक्काची मांडणी करतात. तर रमाबाई स्त्रीशिक्षणाचे महत्त्व सांगतात, परंतू त्या स्त्रीला स्त्रीधर्म पालनाचा सल्ला देवून एकप्रकारे पुरूषसत्ताक समाजाचा पुरस्कार करतात.

'स्त्री–पुरूष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' ची तुलना

स्त्रीधर्मासंबंधी दोघींची भूमिका

ताराबाई व रमाबाई आपल्या ग्रंथांच्या सुरूवातीस स्त्रीधर्म म्हणजे काय? हे स्पष्ट करतात. रमाबाई विवाहानंतर व वैधव्यानंतरही स्त्रीधर्म पालनास प्रोत्साहन देतात व मुळात त्या स्त्रीने कोणत्या धर्माचे, नीतिचे पालन करावे हे सांगण्यासाठीच 'स्त्रीधर्मनीति' ग्रंथाची निर्मिती करतात. त्यामुळे त्या एकप्रकारे स्त्रीधर्माबाबतची जी मते पूर्वापार चालत आली त्यांना त्या पाठिंबा देतात.

पं. रमाबाई पत्नीने कसे वागावे याविषयी उपदेश करताना स्पष्ट करतात की, "आपल्या पतीच्या मनास पसंत पडेल असे आचरण ठेवीले पाहिजे. त्यांच्या मनाविरूद्ध असेल ते कधी करू नये. त्यांच्यासमोर उंच स्वराने कधी बोलू नये. कोणत्याही वेळी त्यास तुच्छ करू नये. धर्मास अनुलक्षून जे तो सांगेल ते काम फार परिश्रम झाले तरी करावे." [पं. रमाबाई (१८८३) ८८, ८९] असे रमाबाई स्त्रियांना स्त्रीधर्माचे पालन करण्यास सांगतात.

ताराबाई ह्या स्त्री धर्माप्रमाणे पतिव्रताच्या नियमांचे पालन कोणीही करत नसल्याचे स्पष्ट करतात. त्यासाठी त्या अनेक दाखले देतात. त्या लिहितात, "नवऱ्याने पाणी मागितले म्हणजे, बाईसाहेब म्हणायाच्या, आहो मला पण केव्हाची तहान लागली आहे, त्या तांब्यात पाणी आहे ते तुम्ही प्या नी मलाही एक प्यालाभर द्या." [मालशे (१९७५) २] असे उलट बोलतात. पूर्वी नवऱ्याने आंघोळीचे नाव घेतले की, स्त्रिया आंघोळीला

पाणी विसावून ठेवत. परंतु आता तसे न करता बायका कोण आहे रे, यजमानाला आंघोळीला पाणी दे अशी नोकरांना आज्ञा करतात. पूर्वी पतीने जेवण मागितल्यावर पत्नी त्याला आवडेल ते पदार्थ करून वाढीत. पण आता तसे न होता नित्याचेच आहे असे म्हटले जाते. विड्याबिड्याचे नाव घेतल्यास उलट पत्नी पतीला विडा करून घेण्यास व स्वत:स देण्यास सांगते. असे अनेक दाखले देवून नवऱ्याची आज्ञा कोणतीही स्त्री पाळत नाही असे ताराबाई येथे स्पष्ट करतात. यावरून ताराबाई व रमाबाई नवऱ्याची आज्ञा पाळून स्त्रियांनी स्त्रीधर्माचे आचरण करावे अशी अपेक्षा व्यक्त करतात.

पं. रमाबाई स्त्रीधर्म पालनाबाबत पुरणातील स्त्रियांचे दाखले देऊन स्पष्टीकरण देतात. येथे त्या सीता, सावित्री, अरूंधती, दमयंती यांची उदाहरणे देतात. लोपामुद्रा ही राजकन्या असूनही ती पती अगस्ती ऋषींच्या सोबत सर्व सुखे त्याग करून अरण्यात गेली. सीताही रामाच्या पाठीमागून वनवासास गेली. ती पतीसोबत सर्व दु:खास सामोरी गेली. येणाऱ्या सर्व संकटांना ती सामोरी गेली. रामाने सीतेचा परित्याग करूनही सीतेचे पतीवरील प्रेम व पातिव्रत्य अणुमात्रही ढळले नाही. पं. रमाबाई येथे दमयंती, सावित्री यांचेही दाखले देतात व या साध्वी स्त्रियांप्रमाणे स्त्रियांना चरित्र आत्मसात करण्यास सांगून या स्त्रियांसाठी अभिमानही व्यक्त करतात.

तर ताराबाई पूर्वयुगात शास्त्रकर्त्यांनी सांगितलेल्या पतिव्रता स्त्रिया दोषास पात्र असल्याचे स्पष्ट करतात. यावेळी त्या द्रौपदी, गांधारी, तारा, सिता, अहिल्या, मंदोदरी यांची उदाहरणे देतात. त्या लिहितात की, ''द्रौपदी पाच नवऱ्याची बायको असूनही कर्ण महाराजांचे अंतर्यामी चिंतन करत होती का नाही? अहिल्या सुरेंद्रच्या आंकारूढ होऊन शिळा (होऊन) पडली, आष्टाधिकार झाले. सत्यवती, कुंती ह्यांनी आपले कुमारदशेतच, श्रीवेदव्यास, एकीनें कर्ण असे दोन पुत्र प्रसवल्या. तरीही त्यांचे पटातच नाव!'' [मालशे (१९७५) ३] अशाप्रकारे ताराबाई या पुराणातील आदर्श स्त्रियांवरच हल्ला करतात.

शास्त्रकर्त्यांनी ज्या स्त्रियांना स्त्रीचा आदर्श मानले त्या स्त्रियांच्या वर्तनातील दोष ताराबाई दाखवून देतात व पूर्वयुगातील पतिव्रतांच्या मर्यादा स्पष्ट करतात.

ज्याप्रमाणे स्त्रीने पत्नीधर्म पाळावा त्याप्रमाणेच पुरूषांनी धर्मविरोधी कार्य केल्यास किंवा तसे करण्यास पत्नीला सांगितल्यास पत्नीने त्यांना सद्बोध करून दु:मार्गापासून परावृत्त करावे असे मत पं. रमाबाई व ताराबाई दोघीही मांडतात. स्त्रीने अशा कार्यात पतीला साथ देवू नये असे दोघीही स्त्रियांना सल्ला देतात. हे साम्य दोघींमध्येही आहे.

स्त्री–पुरूष परस्परपूरकता

पतीला संसारामध्ये साथ देण्याचा उपदेश ताराबाई व रमाबाई करत असल्या तरी त्यांना स्त्री–पुरूषांमधील परस्पर प्रेम, परस्परपूरकताही मान्य आहे. ताराबाई 'स्त्री–पुरूष तुलना' ग्रंथाच्या सुरुवातीसच परमेश्वराने स्त्री–पुरूष निर्माण केले असे लिहितात. स्त्रीचे महत्त्व पटवून देताना ताराबाई सांगतात, ''स्त्री तर पैशापेक्षाही अतिवेधक असून तुमच्या जिवाला लक्ष्मीपेक्षा लक्षपट सुख देणारी आहे.... स्त्रीविरहित राजवाडा केवळ स्मशान.'' [मालशे (१९७५) ६] त्याप्रमाणेच पुरूषविरहित स्त्रियांनाही सुख वाटणार नाही. ऐशआराम, सार्वभौमत्व दिले तरी ती एकटी राहू शकत नाही. स्त्री–पुरूष परस्पर पूरक आहेत. अशाप्रकारचे रमाबाईंचेही मत होते. रमाबाई व ताराबाई दोघीही ईश्वराने स्त्री–पुरूष परस्परपूरक निर्माण केल्याचे सांगतात. रमाबाई हा संसार ईश्वराचा मानतात. हा संसार पूर्ण होण्यासाठी स्त्री–पुरूष दोघांनी एकमेकांच्या साथीने रहावे व परस्परांना सहाय्य करावे, कारण स्त्री–पुरूष ही संसाराची दोन अंगे आहेत असे दोघीही स्पष्ट करतात. तसेच पुरूष कितीही मोठे विद्वान, शूर, धनी नि:स्पृह झाले तरी स्त्री शिवाय पुरूषांना महत्त्व नाही असे ताराबाई व रमाबाई मत मांडतात. ताराबाई सिताविरहित रामाचे वर्णन करतात.

रमाबाई लिहितात की, ''स्त्रीपुरूषांनी परस्परांच्या आश्रयाने वागावे आणि एकमेकांच्या अधीन होवून राहावे हाच ईश्वराचा अभिप्राय होय. म्हणूनच परमेश्वराने

त्यांचा स्वार्थ परस्परांच्या सहाय्यावाचून सिद्धीस न जावा असाच संबंध त्यांच्यात ठेवला आहे.'' [पं. रमाबाई (१८८३) ७९] असा परस्परपूरकतेचा दृष्टिकोन ताराबाईही 'स्त्री-पुरूष तुलना' पुस्तकात स्पष्ट करतात.

स्त्री पुरूषावर अतोनात प्रेम करते. त्याला जीव लावते, त्याची बेइज्जत करत नाही, त्याच्या नावाला बट्टा लावत नाही, स्त्रिला अबला म्हणणारा पुरूष तरी काय स्त्री शिवाय सबळ झाला काय? तिच्या कुचकमंडलूंतले अमृत पिल्याशिवाय कोणत्या पुरूषाची वाढ झाली आहे काय? असा ताराबाई सवाल करतात व पुरूषांच्या जडणघडणीत असणारा स्त्रीचा वाटा महत्त्वाचा असल्याचे सांगतात. एवढे महान कार्य करणाऱ्या स्त्रिया अखेर बंदीवानाचे जीवन जगत असल्याबद्दल त्या खंत व्यक्त करतात. असे असूनही पतीसाठी संसारात हालअपेष्टा सहन करणाऱ्या पत्नीला कुटुंबात समाजात स्थान नाही. अशी ताराबाई व्यथा मांडतात व स्त्री-पुरूषात समानता असावी. स्त्री-पुरूषांचे निसर्गदत्त कार्यकर्तव्य वेगवेगळे असले तरी स्त्री-पुरूष समान आहेत, स्त्री-पुरूषांनी परस्परांविषयी समान आदर ठेवला पाहिजे, समाजातही समान स्थान असावे अशी भूमिका ताराबाई घेतात. ममत्वचे न्यूनत्व न मानता मातृत्त्व हे सामर्थ्य आहे हे ताराबाई व रमाबाई येथे स्पष्ट करतात.

विवाहासंबंधीची मते

१९ व्या शतकात विवाहाच्या तऱ्हाही वेगवेगळ्या होत्या. त्यात स्त्रीलाच बळी दिले जात. रमाबाई व ताराबाई या विवाहाच्या तऱ्हा अनुक्रमे ' स्त्रीधर्मनीति' व 'स्त्री-पुरूष तुलना' या ग्रंथात स्पष्ट करतात. बालविवाह, जरठबाला विवाह हे तर स्त्रीचे शोषण करणारे मार्ग आहेत असे ताराबाई स्पष्ट करतात. जरठबाला विवाहानंतर नवरा मेला की लहान असणाऱ्या मुलीला नवऱ्याशिवाय रहावे लागे. काही रूपयांसाठी मुलगीचे जीवन उध्वस्त होत होते. तिला एकटीलाच समाजाला सामोरे जावे लागे असे ताराबाई लिहितात.

त्याप्रमाणेच रमाबाईही बालविवाहावर टिका करून असे म्हणतात की, वास्तविकत: ८ ते २० वर्षे ही ज्ञानसंपादनाची असतात या वयात विवाह झाला तर ज्ञानोपासनात व्यत्यय येतो व ज्ञानाशिवाय जन्म म्हणजे त्यापेक्षा पशुजन्मही श्रेष्ठ असे मानतात. काही सत्पुरूष हे पत्नीच्या दुर्व्यवहाराने संतप्त होवून स्त्रीहत्या, व्यभिचार इ. महापातके करतात. "हा दोष कोणाचा? हा गुन्हा त्या स्त्री–पुरूषांचा नव्हे; परंतू, अनुचित आधिपत्य घेऊन, त्यांची आपल्या पसंतीने योग्य संबंध करण्याची स्वाधीनता अपहरण करणाऱ्या, आणि अकाली लग्न लावून त्यांच्या उन्नतीरूपी वृक्षाच्या मुळास कुऱ्हाड मारणाऱ्या समाजाचाच होय." [पं. रमाबाई (१८८३) ८२] याबाबत रमाबाई स्त्री–पुरूष दोघांनाही दोषी मानत नाहीत. त्या विवाहाची स्वाधीनता हिरावून घेणाऱ्या समाजास दोष देतात. त्यामुळे त्या विवाह स्वाधीनता स्त्री–पुरूषात असणे आवश्यक असल्याचे सांगतात.

पं. रमाबाई विवाहासाठी योग्य वयाची अट घालतात. स्त्री–पुरूषांनी आपले वय विवाहास उपयुक्त म्हणजे २० वर्षांचे किंवा त्यापेक्षा वर्ष सहा महिने कमी अगर जास्ती असावे असे रमाबाईंनी म्हटले आहे. शिवाय आपल्या योग्यतेस अनुरूप अशा मनुष्याबरोबरच विवाह करावा. तो लोकांच्या पसंतीने, धनलोभाने अथवा कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाने भुलून करू नये. असे रमाबाई स्पष्ट करतात. विवाहावेळी स्त्रिचे वय काय असावे यासंबंधी ताराबाई मत प्रदर्शित करत नसल्या तरी विवाहामध्ये परस्परसंमती किंवा परस्पर अनुरूपता याऐवजी आर्थिक व्यवहार केंद्रस्थानी असतो असे त्या म्हणतात. 'लग्नात केंद्रस्थान पटकावणाऱ्या अर्थव्यवहाराची दखल ताराबाईंनी देखील आपल्या विवाहविषयक विवेचनात घेतली आहे. म्हणजे याबाबतीत दोघींच्या भूमिकेत साम्य आहे.' [खोले (१९९९) ८१]

लग्न करताना स्त्री–पुरूष दोघांचीही संमती असणे गरजेचे असते. जसे पतीला कुरूप दुर्गणी पत्नी आवडत नाही त्याप्रमाणे पत्नीलाही कुरूप, दुर्गुणी वाईट पतीही

आवडत नाही. त्यामुळे दोघांच्या पसंतीने विवाह व्हावा त्यासाठी आई वडिलांनी वर पाहताना योग्य वर निवडावा असा ताराबाई सल्ला देतात. तर रमाबाईही रूपवधन न पाहता प्रेमविवाहाची तरफदारी करतात. ताराबाईच्या पुढे जाऊन त्या प्रेमविवाहाला प्रोत्साहन देतात. १९ वे शतक पुढारलेले नसतानाही रमाबाई प्रेमविवाहाचा पुरस्कार करतात. हे त्याकाळातील समाजाला न रूचणारे होते. आजची स्थिती पाहता हे मत अंमलात येण्यासाठी शतक पार करावे लागले. तेव्हा कुठे आजचा समाज प्रेमविवाहाला संमती देत आहे. संसारात पती–पत्नीमध्ये प्रेमभावना आवश्यक असल्याची भूमिका ताराबाई व रमाबाई दोघीही घेताना दिसतात. 'तसेच पंडिता रमाबाई प्रेमविवाहाची भूमिका ही त्यांच्या स्वानुभवावरून घेतात. त्यांनी आवडत्या पुरूषाबरोबरच विवाह केल्याचे दिसून येते. दु:दैव असे की, विवाहानंतर काही काळाने झालेल्या पतीनिधनामुळे त्यांना फारसे विवाह सौख्य लाभले नाही. याउलट तर ताराबाईंची मानसिक अनुकूलता लक्षात घेता ताराबाईंच्या वडिलांनी घरजावई करून आणल्यामुळे फारसे विवाह सौख्य लाभले नसावे असे म्हणावयास जागा आहे.' [खोले (१९९९) १]

ताराबाई आपल्या ग्रंथात बहुपत्नीत्वाची समस्या मांडतात. बहुपत्नीत्व, पुनर्विवाह, विधवास्थितीबाबत ताराबाई अगदी कठोर शब्द वापरतात व पुरूषजातीला धारेवर धरतात. परंतु यावेळी रमाबाईंची स्त्री प्रश्नांबाबत भूमिका ताराबाईंइतकी कठोर नसलेली दिसून येते.

ताराबाई पुरूष अनेक विवाह करतात यावर टिका करतात. त्याकाळी पुरूष पहिली पत्नी जीवंत असो वा नसो अनेक विवाह करत. स्त्रिच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर त्यामुळे गदा येत. पतीने अनेक विवाह केल्यामुळे स्त्रिला सवतीमत्सर सहन करावा लागतो असे ताराबाई येथे स्पष्ट करतात. त्याबाबत त्या जाब विचारतात की, पुरूषाला अनेक पत्नी करण्याचा अधिकार असेल तर स्त्रिलाही अनेक पती करण्याचा अधिकार का नाही?

ताराबाई त्याकाळी पूनर्विवाहबंदीवरही टिका करतात. त्या 'स्त्री-पुरूष तुलना' ग्रंथाच्या सुरूवातीसच पूनर्विवाह बंदी सर्व जातीत पसरत असल्याची खंत व्यक्त करतात. त्या लिहितात की " पुनर्विवाह न करण्याची रीत ब्राह्मणातच आहे असे नाही तर उच्च समजल्या जाणाऱ्या वर्णाच्या मानाने नीच समजल्या जाणाऱ्या वर्णातही पुनर्विवाह न होण्याची सक्ती अधिक दिसून येत." असल्याची खंत व्यक्त करतात. यात अमूक जाती किंवा कूळ याकडे विशेष लक्ष नसल्याचेही त्या यावेळी स्पष्ट करतात. उच्च वर्णाचे अनुकरण करून आपले वर्णाची उच्चता, श्रेष्ठता स्पष्ट करण्यासाठी बहुजन हा मार्ग स्वीकारतात हे यावरून स्पष्ट होते. 'ताराबाई वर्ण आणि जातीच्या अभिमानापासून त्या किती दूर होत्या, स्त्री जातीच्या किती अभिमानी होत्या हे आपल्या लक्षात येईल.' [भालेराव(२००८)१९] तर रमाबाईही कोणत्या जातीचा अभिमान न करता केवळ स्त्री जातीसाठीच झटत होत्या. त्या कोणत्याही विशिष्ट धर्माविषयी किंवा जातीविषयी 'स्त्रीधर्मनीति' मध्ये उद्‌बोधन करीत नाहीत.

पुनर्विवाहाची चाल रूढ नसल्यामुळे स्त्रियांना तारूण्याचे इंगळ पदरात घेऊन रहावे लागते अशी ताराबाई भूमिका घेतात. पुनर्विवाह नसल्यामुळे तरूणपणी आलेल्या विधवापणामुळे स्त्रीधर्म पालन होणे धोक्याचे आहे. व्यभिचारी व अहंकारी पुरूष सत्तेत विधवापण जपणे खूप कठीण असल्याची जाणीव ताराबाई करून देतात. पुनर्विवाहाची प्रथा नसल्यामुळेच विजयालक्ष्मीला भ्रुणहत्येच्या आरोपाखाली फाशी व सक्त मजुरीची शिक्षा झाल्याचे त्या स्पष्ट करतात. त्यामुळे त्या स्त्रिला वाईट मार्गाला लावणाऱ्या कामांध पुरूषांना कारागृहात टाकायला हवे अशी मागणी करतात. पुनर्विवाह करून स्त्रीवर होणाऱ्या पती निधनानंतरचे सती, केशवपन सारख्या अन्यायातून सुटका होऊन ती पतीबरोबर सुखाने संसार करेल असा ताराबाई उपायही शोधतात. पुनर्विवाह बंदीमुळेच स्त्रिया व्यभिचाराकडे वळतात असे त्या यावेळी स्पष्ट करतात. स्त्रिला पतीनिधनानंतर केशवपन, सतीसारख्या प्रश्नांना सामोरे जावे लागत. पतीनिधनानंतर सर्व त्रास स्त्रिलाच का? बायको

मेल्यावर दुसरी करायला फक्त पुरूषांनाच मोकळिक का? नवरा मरावा म्हणून स्त्रिया काय देवाजवळ प्रार्थना करतात काय? पतीनिधनानंतरची स्थिती पाहता कोणतीही स्त्री अशी प्रार्थना करू शकणार नाही असा टोलाही त्या यावेळी लावतात. विधवा झाल्यावर पत्नीला नवऱ्याबरोबर सती जावे लागते तर पत्नी मेल्यावर पतीनेही सता का जावू नये? अशी जोतीराव फुलेंप्रमाणे त्या भूमिका घेतात. पण स्त्री–पुरूष भेदभावासंबंधी अशी जहाल भूमिका मात्र रमाबाई 'स्त्रीधर्मनीति' ग्रंथात घेताना दिसत नाहीत. त्या धर्मपरंपरेला अनुसरून स्त्रियांनी वर्तन करावे व आपला स्वाभिमान जपावा असे मानतात. अशारितीने विवाह संस्थेमध्ये स्त्री–पुरूषांच्याबाबत होणाऱ्या भेदभावाबद्दल त्यातून स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबाबत ताराबाई अधिक चिकित्सक असल्याचे दिसते. तर रमाबाई स्त्री–पुरूष भेदभावासंबंधी फारसे प्रश्न उपस्थित करत नसल्यातरी बालविवाह, बहुपत्नीत्व इ. प्रकारावर ताशेरे ओढतात. शिवाय त्या स्त्रीने धर्मपरंपरेनुसार स्त्रियांनी आदर्श गृहिणी होण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही म्हणतात.

स्त्रियांवरील अत्याचार

समाजात दुष्कृत्ये वाढण्याचे कारण ताराबाई व रमाबाई धर्मशास्त्र व पुरूष असल्याचे मानतात. देशातील स्वार्थपर, अदूरदर्शी पुरूषाच्या अत्याचाराने पशुवत, निरपराधी व दासी बनलेल्या स्त्रियांमुळे भारतामधील लोक दुर्बल व निरूत्साही बनल्याचे सांगतात. स्त्रियांना ज्ञान मिळवू न देणे, शास्त्राध्ययनाचा अधिकार न देणे दासीप्रमाणे पतीजवळ रहाणे, पतीसेवेने मोक्ष मिळतो ही कर्तव्ये पुरूषांनी व धर्मशास्त्रांनी आपमतलबी, स्वार्थी हेतू ठेवून निर्माण केल्याचे ताराबाई व रमाबाई सांगतात. स्त्रियांवर दास्याचा परिणाम होऊन त्यांना होणारी मुलेही निष्क्रयी बनतात असे मत रमाबाई मांडतात. देशातील पुरूषांच्या मनात स्त्रियांविषयी नीच भाव असतात, स्वत:स मोठे समजून ते स्त्रियांवर सत्ता चालवतात असा आरोप दोघीही करतात. स्त्रियांवर अन्याय

करणाऱ्या पुरूषांवर साहसी नसल्याचा आरोप ताराबाई व रमाबाई करतात. त्यामुळे स्त्री दास्याला विरोध करण्यास त्यांचे एकमत बनले आहे.

स्त्री–पुरूष गुणांची मिमांसा

ताराबाई व रमाबाई दोघींच्या ग्रंथात स्त्री–पुरूष दुर्गुणांना महत्त्वाचे स्थान आहे. स्त्री अन्याय व स्त्री दास्याबाबत दोघींनीही वाचा फोडली आहे. परंतु यामागे पुरूषांची अहंकारी प्रवृत्ती असल्याचे कारण ताराबाई लिहितात. तर स्त्री अन्यायामागे पुरूष असले तरी स्त्रीचे कर्मही त्यामागे असल्याची भूमिका रमाबाई मांडताना दिसतात. ताराबाई ग्रंथाच्या निम्म्याहून अधिक भागात पुरूषांच्याठायी असणाऱ्या दुर्गुणांवर टिका करतात. व या दुर्गुणांना स्त्रिया कशा बळी पडतात हे त्या निदर्शनास आणतात. पुरूषांचा व्यभिचार, विवाह, पोषाख यावर ताराबाई टिका करतात. पुरूषांच्या वर्तुणुकीमुळे स्त्रियांनाही अनाचार करावा लागतो असे त्या येथे लिहितात. पुरूष दगाबाजी करतो व दुष्कृत्याचे खापर स्त्रीवर फोडतो त्यामुळे स्त्रीलाच समाजास सामोरे जावे लागते. पुरूष सत्ताक व्यवस्थेत पुरूषाने कसेही वागले तरी चालते, त्याने दुष्कृत्य केले तरीही त्याला कोणी काही बोलत नाही, त्याला समाजात वाईट वागण्यास शास्त्रकर्ते व धर्माने परवानगी दिली आहे त्यामुळे पुरूष अहंकारी बनले आहेत व स्वैराचारीही बनले आहेत असा आरोप ताराबाई व रमाबाई दोघीही करतात. मुळात पुरूष हे दुर्गुणी प्रवृत्तीचेच असतात व त्यांना शास्त्रकर्ते पाठिंबा देतात. पुरूषच स्त्रियांना फुस लावतात, स्त्रिया व्यभिचारी बनतात व संकट येताच पुरूष त्यांना सोडून जातात. स्त्रिया व्यभिचारी बनल्यामुळे भ्रुणहत्येसारखा प्रश्न उद्‌भवतो. त्या काळातही भ्रुणहत्त्या हा गुन्हा मानला जात असे. त्यामुळे ब्रिटीश सरकार भ्रुणहत्त्येसारख्या आरोपाखाली स्त्रिला शिक्षा सुनावत व त्यामुळे स्त्रिया समाजासमोर कलंकीत होत. परंतू या कलंकात सहभागी असलेला पुरूष सहिसलामत सुटतो. अशाप्रकारे विजयालक्ष्मीला शिक्षा झाली हा अन्याय समाजासमोर आणण्यासाठी ताराबाईंनी स्त्री–पुरूष विषमता मांडणारे ' स्त्री–पुरूष तुलना' हे पुस्तक लिहिले.

रमाबाईही स्त्रीवर अन्याय होतो आहे हे मान्य करतात. तरीही त्या स्त्रीने पुरूषांप्रमाणे न वागता माता, गृहिणी, पत्नी म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचा उपदेश देतात. व पुरूषांना त्यांच्या दुष्कृत्यांपासून दूर न्यावे असे त्या स्पष्ट करतात. त्यासाठी प्रथम त्या स्त्रियांना आळस, अहंकार, क्रोध, द्वेष, लोभ, हिंसा, निंदकता, कपट, असत्य, उतावळेपणा, मान, दंभ, स्वार्थपरता, ईर्ष्या, अमिताचार इ. दुर्गुणांस जवळ न करण्यास सांगतात. तसेच माझ्यापेक्षा कोणी मोठा नाही असा अहंकार करू नये. ' अहंकार हे अज्ञानाचे मुख्य चिन्ह आणि अध:पाताचे पूर्व लक्षण आहे'. [पं. रमाबाई (१८८३) १०२] असा अहंकार स्त्रियांनी बाळगू नये असा सल्ला त्या देतात. संसार चालविणाऱ्या स्त्रियांनी वरील दुर्गुणांपासून लांब रहावे. कारण, " इकडे संसारात तर पुष्कळ प्रकारच्या स्वभावांची माणसे असतात. त्या सर्वात मिळून एकोप्याने वागण्यास मोठे धैर्य, सहिष्णुता, क्षमा आणि प्रेम हे गुण सदोदित आपल्या अंगी असले पाहिजेत." [पं. रमाबाई (१८८३) १०३] स्त्रिने आपल्या प्रेमाने, कर्तव्याने समाज व कुटुंबात आपले स्थान निर्माण करावे असा रमाबाई उपदेश करतात.

रमाबाई दुर्बळांना सहाय्य करणे यासारखा उत्तम धर्म कोणताच नाही असे मत व्यक्त करतात. व जे विपत्तीत दुसऱ्यास सहाय्य करतात त्या मनुष्यास चोहोंकडून सहाय्य मिळते व सर्वांवर प्रभुत्व मिळविण्यासाठी स्वत:च्या प्राणाप्रमाणे प्रेम करण्यास त्या सांगतात. याउलट, कर्तव्य पार पाडूनही स्त्रिजातीची समाजात व कुटुंबात सत्ता नसावी अशी ताराबाई खंत व्यक्त करतात. तर रमाबाई हिच कर्तव्ये कितीही अन्याय झाला तर पार पाडावीत असा काहीसा विरोधाभास असणारे उपदेश स्त्रियांना देतात. ताराबाई समाजातील पुरूषी अहंकारावर हल्ला चढवताना पुरूषी दुर्गुणांचा उल्लेख करतात तर रमाबाई स्त्रियांवरच दुर्गुणांचा आरोप करतात. याबाबत या दोघींमध्ये विरोधाभास असल्याचे दिसून येते.

ताराबाई स्त्रिया पुरूषांमुळे दुराचरण करतात असे लिहितात. मात्र रमाबाई ह्या पुरूष दुराचरणी वगाले तरी स्त्रिनेही त्याप्रमाणे वागू नये असे सांगतात. स्त्रियांनी सदाचरणी रहावे, पुरूष कितीही वाईट वागला तरी स्त्रिने आपला पत्नी धर्म, स्त्रीकर्तव्य, सदाचरण पालन करण्यास त्या सांगतात. दोघींच्या लेखनात सुधारणा हेतू आहे. परंतू, ताराबाई स्त्रियांच्या दु:स्थितीच्या निमित्ताने पुरूषांच्या अंगी असणाऱ्या दुर्गुणांची चर्चा करतात. तर रमाबाई स्त्रियांमध्ये असणाऱ्या विविध दोषांचे दर्शन घडवितात व हे दुर्गुण टाकून देवून पतीशी सामंजस्याने वागणेविषयी उपदेश करतात.

रमाबाई स्त्रियांच्या पराधीनता व आळशी वृत्तीवर टिका करतात. व स्त्रियांना स्वाधीनता व आत्मावलंबी होण्यास सांगतात. सुखप्राप्तीसाठी हे आवश्यक आहे. "ज्याच्या अंत:करणात आत्मावलंबन नाही त्यास योग्य स्वाधीनताही नाही." [पं. रमाबाई (१८८३) ५] व हे आत्मावलंबन सांप्रत काळी स्त्री जातीत नाही अशी खंत व्यक्त करतात. स्त्रिया आळशी असून पुरूषांना सहाय्य करीत नाहीत, त्यामुळे पुरूष स्त्रियांस कठोर व लज्जादायक बोलणी बोलतात असे रमाबाई पुरूषांच्या स्त्रिला दुषणे देण्याला समर्थनच करतात. दुष्कृत्य करणाऱ्या व वेश्या असणाऱ्या स्त्रियांजवळ जाऊ नये असाही रमाबाई सल्ला देतात. तर ताराबाई वेश्या म्हणजे कोण? तर पुरूषांनीच फसवूण स्त्रियांना वेश्या बनवलेले असतात असा ताराबाई आरोप व्यक्त करतात. यावरून ताराबाई स्त्री जातीची प्रत्येक आरोपातून सुटका करून पुरूषांनाच आरोपीच्या चौकटीत उभा करतात. स्त्री जातीच्या त्या जणू येथे वकीलच झाल्या आहेत. तर रमाबाई अशी स्त्रीबाबतीत परखडपणे बाजू मांडत नाहीत.

पुरूष दुर्गुणी व स्त्रिया प्रखर तेजाच्या सूर्यप्रकाशाइतक्या गुणी आहेत अशीही एकतर्फी बाजू ताराबाई घेत नाहीत तर त्या स्त्रियांनाही मर्यादेप्रमाणे सांगायला विसरत नाहीत. समाजाशी व कुटुंबाशी एकनिष्ट रहाण्याचा सल्ला देतात. रमाबाईही स्त्रियांना मर्यादा पालनाचा आदेश देतात. त्या लिहितात, " मनुष्यात हजारो गुण असले तरी, जर त्याच्या

अंगी गांभिर्य आणि मर्यादाही नसली तर त्याची कोठेच प्रतिष्ठा होत नाही. " रमाबाई स्त्रियांना विनय, नम्रता यांचे पालन करण्याचा उपदेश देतात. यासाठी त्या पुढील दहा गुण स्पष्ट करतात. १) धृति म्हणजे धैर्य, २) क्षमा, ३) दम म्हणजे मनोनिग्रह, ४) अस्तेय म्हणजे चोरी न करणे, ५) शौच–शुचिता, ६) इंद्रियनिग्रह, ७) बुद्धी, ८) विद्या म्हणजे परमेश्वरासंबंधी ज्ञान, ९) सत्य, १०) अक्रोध म्हणजे क्रोध आणि त्यांचीच रूपे ईर्ष्या, परपीडेच्छा, द्वेषप्रभृति नसणे. ही धर्मपालनाची नियम रमाबाई सागतात. अशाप्रकारे स्त्रियांनी वागावे व पुरूषांप्रमाणे वागू नये, त्यांनी शुद्धचरित्राचा अवलंब करावा, सदाचरणाने पुरुषांना खाली पहावयास लावावे असा स्त्रिला ताराबाई रमाबाईंप्रमाणेच सल्ला देतात. लक्ष्मीप्रमाणे मुलाबाळात, वैभवात सुखी रहाण्यास सांगतात. त्याप्रमाणेच रमाबाई स्त्रियांना मर्यादशील जीवन जगण्याचा सल्ला देतात. दोघीही संसार हा पतीपत्नीच्या सामोपचाराने चालतो हे मत मान्य करतात.

स्त्री–शिक्षण

१९ व्या शतकात स्त्री शिक्षणाची सुरूवात झाली होती. परंतु अर्थार्जन हा त्यामागील हेतू नव्हता. तर स्त्री आपली कर्तव्ये पार पाडण्याइतपतच स्त्री शिक्षणाचे महत्त्व होते. त्याकाळात ताराबाई व रमाबाई धर्मशास्त्र, नितीशास्त्र, रूढी–परंपरा यांच्या संदर्भात लेखन करतात. ताराबाई मात्र स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना समाजव्यवस्था व पुरूषी अरेरावी वृत्तीचा समाचार घेताना कठोर शब्द वापरतात. 'समाजातील स्त्री–पुरूष नात्याचा इतक्या बारकाईने विचार करणाऱ्या ताराबाईंच्या पुस्तकात स्त्रीशिक्षणाचा विशेषत्वाने विचार का झाला नाही ते उमगत नाही.' [खोले (१९९९)६३] परंतु रमाबाई आपल्या ग्रंथात स्त्रियांना उपदेश करताना विद्यासंपादन करण्याविषयी मार्गदर्शन करतात. स्वावलंबन, उन्नती करण्यासाठी विद्या आवश्यक असल्याचे त्या सांगतात. त्यासाठी " बुद्धिवान व विचारी अशा मनुष्याने, ज्या धनाचा नाश होत नाही, आणि ज्यापासून होणारे सुखही अनंत म्हणजे ज्याचा अंत नाही असे धन मिळविण्याचा उद्योग केला पाहिजे.....

विद्या हे अक्षय्यधन होय." [पं. रमाबाई (१८८३) १७,१८] असे रमाबाई विद्याप्राप्तीचे महत्त्व पटवून देतात. लोकांनी स्वत:चे कल्याण करण्यासाठी ज्ञान वाढवावे व ते वाढविण्यासाठी झटले पाहिजे असे सांगून त्या स्त्रियांना इतिहास, धर्मशास्त्र, पदार्थविज्ञान, भूगोल, अर्थशास्त्र व नीतिशास्त्र व त्याचबरोबर वैद्यकज्ञान, पाकशास्त्राचे अध्ययन करण्यास सांगतात. तर विद्याभ्यास करताना येणारी विघ्नेही रमाबाई येथे स्पष्ट करतात. त्यामध्ये त्या आळस हे मुख्य विघ्न असल्यचे सांगतात. व " मन सुखी होण्यास ज्ञानासारखे दुसरे साधन जगात नाही. विद्या हे अक्षय्य धन याचा चांगला उपयोग केला असता कधी नाश व्हावयाचा नाही." [पं. रमाबाई (१८८३) २२] असे सांगून विद्याप्राप्तीसाठी झटण्याचा रमाबाई स्त्रियांना उपदेश देतात.

त्याचबरोबर रमाबाई कर्तव्य परिपूर्णतेने पार पाडण्यासाठी विद्या आवश्यक आहे असे सांगतात. अशिक्षिततेमुळे स्त्रियांना पुरूषांकडून अपमानित व्हावे लागते. बोलणी ऐकून घ्यावी लागतात. तसेच शास्त्रकर्ते, धर्मवेत्ते जसे सांगतात तसे स्त्रियांना रहावे लागते. वाचता येत नसल्याने पुरूष, भट पुरूषी सत्तेस पूरक नियम घालून देतात त्यामुळे स्त्रियांवर अन्याय होवून पुरूषी सत्तेला अधिक वाव मिळतो. यासाठी रमाबाई स्त्रियांना शिक्षित होवून शास्त्राचे वाचन करून त्याप्रमाणे रहाण्यास सांगतात. व विद्येचा कंटाळा येवू नये म्हणून त्या स्त्रियांना जे शिकाल त्याचा विचार करण्यास सांगतात. तसेच देशातील स्त्रियांना ज्ञान मिळाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही हे समजल्यामुळे सुधारक प्रयत्न करत असल्याचे रमाबाई स्पष्ट करतात. [पं. रमाबाई (१८८३) १] शिक्षणामुळे अर्थप्राप्तीही होते. स्त्रिया उद्योगी बनून अर्थार्जन करतील व पुरूषांना संसारात सहाय्य होईल त्यामुळे पुरूष स्त्रिचा अपमान करणार नाहीत असा रमाबाई स्त्रियांना सल्ला देतात.

यावरून ताराबाईंपेक्षा रमाबाई पुढे जाऊन शिक्षणाने अर्थप्राप्तीची दारे खुली होतील असा विचार मांडतात. रमाबाई म्हणतात, "ईश्वराने तुम्हास नुसते स्वयंपाकादी

कामे करण्यास जन्मास घातले नाही, तुम्ही येथे विचार करून पहाल तर अगणित कामे आहेत.... " [पं. रमाबाई (१८८३) १०] याउलट ताराबाईचे वाचन चांगले असले, त्यांना तत्कालिन घडामोडींची माहिती असली तरी शिक्षणाबाबत त्या फारशा गंभीर आहेत असे दिसत नाहीत. यावरून रमाबाईंचा स्त्री शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन भिन्न असल्याचे जाणवते. रमाबाई स्त्रियांना स्वावलंबी बनून उन्नत होण्याचा मार्ग दाखवितात. उद्योगी बनण्यासाठी स्त्रियांना सांगतात. यावरून आपण म्हणू शकतो की, स्त्री जर उद्योगी बनली तर पतीच्या साथीने विकास करू शकेल. त्याचप्रमाणे पतीनिधनानंतरही ती आपल्या कुटुंबाची योग्यप्रकारे काळजी घेवू शकेल व समाजाने घालून दिलेल्या बंधनातूनही ती मुक्त होण्यास मदत होईल. सध्याचे स्त्री जीवन हे उद्योगी बनले आहे. उद्योगी बनून अर्थप्राप्ती करण्याचा मार्ग आजच्या काळात अत्यावश्यक आहे. हा मार्ग रमाबाईंनी सव्वाशे वर्षांपूर्वी स्त्रियांना दाखविला आहे. यावरून त्यांचा शैक्षणिक दृष्टीकोन व वृत्ती असल्याचे दिसून येते.

अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोनाबाबत

ताराबाई व रमाबाई स्त्रियांच्या अंधश्रद्धेवरही टिका करतात. पूर्वीच्या काळी स्त्रियांना पतीशिवाय दुसरा आधार नव्हता. त्यामुळे पतीची साथ, प्रेम मिळविण्यासाठी त्या अंधश्रद्धेला बळी पडत. पतीप्रेमप्राप्तीसाठी भोंदू लोकांचे ऐकून अंधश्रद्धेने वागतात. असे रमाबाई व ताराबाई यांचे एकमत असल्याचे दिसून येते. स्त्रिया पतीप्रेम व पुत्रप्राप्तीसाठी बैरागी, भोंदूंचे ऐकून अंधश्रद्धेचे पालन करतात. उपास, व्रतवैकल्ये करतात. हे सर्व "त्या संतती, संपत्ती व नवऱ्याची प्रिती संपादन करण्याकरिता काय करतील हे मात्र सांगवत नाही." [मालशे (१९७५) २५] असे ताराबाई टिका करतात. तर रमाबाई अंधश्रद्धा असणे मर्यादेबाहेरील वर्तन मानतात. काही स्त्रिया पतीचे उष्ट खाणे, पतीचे पाय धुवून पाणी पिणे असे सोंग करतात. रमाबाई या सर्वाला अनाचरण मानतात. हे अनाचरण करू नये असे दोघींचेही मत आहे. पतीवरील प्रेम दाखविण्यासाठी स्त्रिया अंधश्रद्धेने

वागतात असे रमाबाई सांगतात. ताराबाई व रमाबाई येथे परंपरावादी दृष्टीकोन सोडून देतात.

ताराबाईंची वैज्ञानिक दृष्टीही दिसून येते. त्या ब्रिटीशांनी लावलेल्या वैज्ञानिक शोधांची दखल घेतात. ब्रिटीशांनी विज्ञान व रेल्वे यांचा शोध लावून देशावर उपकार केल्याची भावना ताराबाई येथे व्यक्त करतात. त्याप्रमाणेच रमाबाई हे शोध ब्रिटीशांच्या उद्योगशीलतेमुळे लागल्याचे मत मांडतात.

स्त्रियांचे स्वतंत्र स्थानाबाबत विचार

समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान पाहूनच ताराबाई ' स्त्री–पुरूष तुलने'ची निर्मिती करतात. व रमाबाई ' स्त्रीधर्मनीति' मधून स्त्रियांना परंपरेनुसार चालत आलेली कर्तव्ये पार पाडण्याचा उपदेश देतात. स्त्री ही पती व घरातील सर्वांना जीव लावते, कष्ट करते तरीही तिला काही बोलण्याचा व घरातील हक्क नव्हता. असे ताराबाई कुटुंबातील स्त्रिचे स्थान दर्शवितात. पती निधनानंतर भोगाव्या लागणाऱ्या मरण यातना तसेच प्रत्येकवेळी स्त्रिच्या वाट्याला येणारा अन्याय पाहून ताराबाई पुरूषांना स्त्रिच्या यातनांची जाणीव करून देतात. ताराबाई लिहितात, ''आपल्या जीवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा. तुम्हाला जसा तुमचा जीव प्यारा तसाच स्त्रियांनाही नसेल काय? स्त्रीया मातीच्या, दगडाच्या नसून स्त्री ही माणूस आहे.'' असे ताराबाई स्त्रीच्या जाणीवांची आठवण करून देतात. तर रमाबाई असे मत कोठेही व्यक्त करत नाहीत. कुटुंब व समाजातील स्थान टिकविण्यासाठी स्त्रीला नवरा व संतती हे दोनच आधार होते. स्त्रीला या व्यतिरिक्त स्वअस्तित्व नव्हते. तिच्या कर्तृत्वाला समाजात किंमत नव्हती असे ताराबाईचे स्त्री अस्तित्वाबाबत मत असल्याचे दिसून येते. परंतु रमाबाई स्त्रिच्या समाजातील अस्तित्व निर्मितीसाठी सर्व कृतीत पतीला सहाय्य करून उद्योगी बनण्यास सांगतात. स्वअस्तित्व निर्माण करण्यास स्त्रियांनी आत्मावलंबन स्वीकारावे. ' स्त्री जातीच्या उत्कर्षाविषयी उपाय करणे तर त्याचा पाया आत्मावलंबन हा आहे.' असे रमाबाई लिहितात. उन्नती करून

घेण्यातील अडथळे कोणते व त्यांचे निवारण काय केल्याने होईल, " इत्यादी विवेचन करून दिवसेंदिवस झटून सर्व स्त्रिया ह्या कामास लागल्या असता थोडक्याच दिवसात, लोकव्यवहारात सत्पुरूषांचे जसे अधिपत्य आहे तसेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक स्त्रियांचे अधिपत्य होईल."[पं. रमाबाई (१८८३)५] आत्मावलंबनाने स्वाधीनता येते तसेच उद्योगी बनण्यासाठीही आत्मावलंबन स्वाधीनता आवश्यक असते. उद्योगी बनल्यामुळे संपूर्ण स्त्री जातीची व देशाची प्रगती होईल असे रमाबाई उद्योगी बनण्यासाठी स्त्री जातीस सांगतात. मी एकटी काय करू असे न म्हणता प्रत्येकीने उद्योगी बनावे त्यामुळे कालांतराने स्त्री जातीचा उत्कर्ष होईल असे रमाबाई स्त्री जातीला आवाहन करतात. ताराबाई असे आवाहन करताना दिसत नाहीत.

पुरूष बलिष्ठ असला तरी त्यास स्त्रीने सहाय्य केले पाहिजे. पुरूष एकटा संसारातील कामे करू शकणार नाही. त्यासाठी त्याला सहाय्य करावे असे रमाबाई स्त्रियांना मार्गदर्शन करतात. ताराबाई स्त्रियांना स्वसामर्थ्याने स्वस्थान निर्माण करण्यास सांगतात. त्या पुरूषांन उद्देशून लिहितात, " अरे, तलवारीने, शस्त्रांनी कोणीही कोणाला घायाळ करीलच करील, यांत काही मोठा पुरूषार्थ नाही. पण जे कोणी नुसत्या दृष्टीनी दुरून पाहिल्याबरोबर हाय हाय करण्यास लावील ते खरे. तेव्हा आता जास्त पराक्रमी कोण? ती स्त्री की तुम्ही?" [मालशे (१९७५) ७] असे ताराबाई परखडपणे पुरूषांना प्रश्न विचारतात. त्या स्त्रीचे शक्तीसामर्थ्य स्पष्ट करतात. परंतु रमाबाई असे स्त्रीचे शक्तीसामर्थ्य स्पष्ट करीत नाहीत तर रमाबाई स्त्रिला कर्तव्यपालनाने स्थान प्राप्त करण्यास सांगतात.

जातीविषयक दृष्टिकोन

ताराबाई व रमाबाई यांचा वैचारिक दृष्टिकोन त्या काळाच्या मानाने प्रगत होता. दोघीही जाती; वर्णभेद विसरून केवळ स्त्रीजातीबद्दल मते व्यक्त करतात. ताराबाई मराठा बहुजन समाजाच्या होत्या. त्या कोणत्याही विशिष्ट जातीविषयी मते मांडत नाहीत. तर सर्व

जातीतील स्त्रियांसाठी झगडतात. तर रमाबाई ह्या केवळ जातीभेद मानत नाहीत असे नाही तर त्यांनी स्वत: आंतरजातीय विवाह केला होता. विवाहाबाबतीत रमाबाई व्यक्तिंच्या गुणांना महत्त्व देतात. रमाबाईंनीही जात न पाहता गुण पाहून आंतरजातीय व्यक्तिशी विवाह केला त्यांचे पती बाबू बिपीन बिहारी मेधावी हे ब्राह्मणेत्तर होते. त्याचप्रमाणे रमाबाई एका विशिष्ट धर्माचाही पुरस्कार करीत नाहीत. त्या कोणत्याही धर्मावर टिका न करता विविध धर्मातील वाईट मतांवर टिका करतात असे त्या स्त्रीधर्मनीतित स्पष्ट करतात. ताराबाईही कोणत्याही जातीविषयी मत मांडत नाहीत. तर उच्च जातीचे अनुकरण खालच्या जातीत केले जाते व त्यातील चालीरितींप्रमाणे वाईट चाली खालच्या जाती स्वीकारतात व त्यामुळे स्त्रीजातीवर अन्याय होतो. असे त्या 'स्त्री-पुरूष तुलना' मध्ये मते मांडतात. ताराबाई येथे खालच्या जाती श्रेष्ठत्व, आपलीही जात उच्च हे दर्शविण्यासाठी ब्राह्मण जातीतील मतांनुसार व चालींनुसार वागतात असे दर्शवितात.

ब्रिटीश सत्तेबद्दल दृष्टीकोन

स्त्रीवरील अन्याय्य अशा सती, पुनर्विवाह बंदी, बालविवाह यासारख्या प्रथांविरोधी कायदे केल्यामुळे ताराबाई ब्रिटीश सत्तेचे आभार मानतात. परंतु भारतीय जनतेने पोशाख, खाणेपिणे याबाबतीत ब्रिटीश सत्तेचे जे अनुकरण केले त्यावर त्या टीका करतात. "वैभव हटत चालले, लक्ष्मीला आपल्या घरी राहून घेण्याकरिता जो जो तुम्ही आग्रह करता तो तो ती तुमचे हे कसले भिकारचाळे, भ्रष्टाचार पाहून कोसाने कोस दूर देशाचाच रस्ता धरू लागले." त्यामुळे स्वदेशी उत्पादनावर परिणाम होऊन आर्थिक नुकसान होत असल्याची खंत व्यक्त करतात. [मालशे (१९७५)२] तात्पर्य, ब्रिटीश सत्तेने घडवून आणलेल्या सुधारणा पाहून त्या त्यांचे आभार मानतात. परंतु ब्रिटीश सत्तेमुळे देशाचे नुकसानही होत आहे असा ताराबाई आरोप करतात. ज्यावेळी धार्मिक सुधारणा ब्रिटीशांनी कराव्यात किंवा न कराव्यात असा वाद चालू होता. त्यावेळी मात्र या वादात न पडता ताराबाई सुधारणा करणाऱ्या ब्रिटीशांचे आभार मानतात. ताराबाई ब्रिटीश सत्तेचे

आभार मानत असल्यातरी त्या ब्रिटीश सत्तेलाही विरोध करतात. सुधारक समाजसुधारणेत मग्न असताना केवळ ताराबाई स्त्रिच्या अस्तित्वाचे महत्त्व समजावून न देता ब्रिटीश सत्तेला कडाडून विरोध करताना दिसतात. मात्र रमाबाई असा ब्रिटीशांविरोधी प्रतिकार नोंदवत नाहीत.

ताराबाई ब्रिटीशांच्या चालीरितींच्या अनुकरणाने देशात आर्थिक अवनती आली आहे असे मत मांडतात. तर रमाबाई ब्रिटीश लोक उद्योगी असल्यामुळे उन्नत आहेत व सर्व देशांवर राज्य करत असल्याचे मत मांडतात व स्त्रियांना तसे उद्योगी बनण्यास सांगतात. अशाप्रकारे ताराबाई व रमाबाई सार्वजनिक जीवनाचा विचार करतात. यावरून दोघींनाही राजकीय भान असल्याची जाणीव होते.

समारोप

ताराबाई व रमाबाई यांच्या स्त्रीप्रश्न मांडणीतील, विचार पद्धतीत तफावत असल्याचे आपणास दिसते. ताराबाई परंपरेनुसार चालत आलेल्या पुरूषीसत्ता व तीने घालून दिलेल्या रूढी, प्रथा यांना पूर्णत: झुगारताना दिसतात. मात्र रमाबाई असे न करता आहे त्या चालीरीतीचे पालन करून स्त्रीने आपले समाजात व कुटुंबात महत्त्वाचे स्थान निर्माण करावे असा उपदेश देतात. स्त्रीची पारंपारिक भूमिका शिक्षणाच्या मदतीने जास्त व्यवस्थितरित्या पार पाडावी यावर त्यांचा भर दिसतो.

रमाबाईंचे व्यक्तीमत्व क्रांतीकारी असले तरी स्त्रिविषयक विचार मात्र पारंपारिकतेची कक्षा ओलांडून पुढे जात नाहीत. त्या ताराबाईप्रमाणे स्त्री-पुरूषांचे सत्तासंबंधाचे अधिष्ठान कोणते असा प्रश्न विचारत नाहीत. त्यांच्या नजरेसमोर पतिव्रता भारतीय नारीची प्रतिमा आहे व त्यास सोडून त्या पुढचा विचार करीत नाहीत. रमाबाईंना पुढील शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जायचे होते. त्यासाठीचा खर्च जमा करण्यासाठीही ह्या पुस्तकाची निर्मिती त्यांनी केली होती. ह्या पुस्तकाचा खप व्हावा यासाठी त्यांनी समाजाला रूचणारी व पटणारी भूमिका घेतल्याची शक्यता नाकारला येत नाही. त्यामुळे अर्थार्जन हे

या ' स्त्रीधर्मनीति' लिखाणामागील कारण होते. मात्र रमाबाईंची ही भूमिका पुढील काळात बंडखोर झाली होती.

स्त्री–पुरूष समानतेचा मुद्दा जरी ताराबाई पुन्हा पुन्हा सिद्ध करत असल्या, तरी त्या पं. रमाबाईंप्रमाणे ठाम व्यक्तिवादी भूमिका घेताना दिसत नाहीत. "आपल्याला आवडेल त्या क्षेत्रात पुरूषाच्याप्रमाणे कर्तृत्व करण्यास स्त्रिला मोकळीक हवी..." असा व्यक्तिवादी समानतेचा विचारही त्या मांडताना दिसत नाहीत. [जोगळेकर (१९९१)१७] मात्र ताराबाई विचारपातळीवर रमाबाईंच्या तुलनेत पुढे गेल्या होत्या. ब्राह्मणी मूलव्यवस्थेमध्ये स्त्रियांवर अन्याय व दडपणूक होते, पुरूषसत्ताकतेत स्त्रिच्या व्यक्तित्वाचा संकोच होतो असे ताराबाईंना वाटते. ताराबाई व रमाबाई तत्कालिन स्त्रिच्या अवनत अवस्थेबद्दल निषेध व्यक्त करतात. स्त्रीसामर्थ्य व स्त्री – प्रतिष्ठेचे सूत्र दोघींच्याही लिखाणात स्पष्ट झाले आहे. मात्र स्त्रीप्रश्न मांडण्याच्या पद्धतीत भिन्नता आढळते. काही सुधारक भाषणे देतात त्याप्रमाणे कृती करीत नाहीत. असा आरोप ताराबाई व रमाबाई दोघीही करतात. रमाबाई केवळ टिका न करता किंवा स्त्री समस्या सोडविण्याबाबत केवळ बोलतच नाहीत तर त्या कृतीही करतात. रमाबाईंनी त्यासाठी संस्थात्मक कार्यही केले आहे. मात्र, ताराबाई अशी कोणतीही कृती केल्याचा उल्लेख सापडत नाही.

संदर्भसूची

१) खोले विलास, (१९९९), स्त्री–पुरूष तुलना, मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई, १४.

२) जोगळेकर मृणालिनी, (१९९१), ' १९ व्या शतकातील स्त्री अस्मितेचा अविष्कार भाग–३' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१.

३) पं. रमाबाई., (१८८३), 'स्त्रीधर्मनीति', पुणे वैभव, पुणे.

४) भालेराव इंद्रजित, (२००८), 'महाराष्ट्राचे शिल्पकार ताराबाई शिंदे' , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती डिसेंबर २००८.

५) मालशे सं.ग., (१९७५), 'स्त्री –पुरूष तुलना', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई.